
21-22

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



# भारतीय स्त्री-शिक्षणाचे प्रणेते

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले

मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

संपादक

प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Scanned with OKEN Scanner

225


ISBN No. 978-81-955479-5-1

मुख्यसंपादक
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार



संपादक
डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे
इतिहास विभागप्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर
मो. ९९२३३५१६७८



प्रकाशक
सिध्दी पब्लिकेशन हाऊस
६२४, बेलानगर, भावसार चौक,
तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५
मो. ९६२३९७९०६७
E-mail: shrishprakashan२००९@gmail.com
www.wiidrj.com

मुद्रक
अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)
९१७५३३२४४३७

प्रथमावृत्ती : ११ एप्रिल २०२२



© सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरच्या अधीन



मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश गं. उंबरकर
मुद्रित शोधन : डॉ. अनिल मुंढे
मूल्य : ५००/-



या पुस्तकातील कोणताही भाग किंवा मजकूर संपादकाच्या व लेखकाच्या परवानगीशिवाय संदर्भासाठी वापरू नये.




# :: संपादकीय ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय स्त्री शिक्षणाचे प्रणेते: महात्मा फुले व सावित्रीबाई फुले" या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे ऑनलाइन आयोजन दिनांक ११ एप्रिल २०२२ रोजी करण्यात आले होते.

महात्मा फुले महाविद्यालयाला महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक आणि समीक्षक असलेले डॉ. वसंत बिरादार हे प्राचार्य म्हणून लाभलेले आहेत व त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महात्मा फुले महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उंच अशी गरुडभरारी घेतलेली आहे. माननीय प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले महाविद्यालयाच्या इतिहास विभागाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. बब्रुवान मोरे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. इतिहास विभागाच्या वतीने व छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने दरवर्षी महात्मा फुले महाविद्यालयात शिवजयंतीचे आयोजन केले जाते. वर्षभर प्रेरणादायी महापुरुषांचे जयंती दिन व स्मृतिदिन साजरे केले जातात. त्याचबरोबर राज्यपातळीवरील निबंध स्पर्धा घेतल्या जातात. तसेच सातत्याने विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापकांसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे व चर्चासत्रांचे आयोजन कुशलतेने केले जाते.

महात्मा जोतीबा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ समाजचिंतक होते. त्यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाज, दलित महिला यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. सनातनी विचारांवर टीकेचे आसूड ओढले. निरनिराळ्या जातींच्या व पंथांच्या लोकांना बंधुभावाची शिकवण दिली. शिक्षण हे सर्वांगाने सुधारणेचे प्रवेशद्वार आहे,




T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)
SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य | संध्या अनिल रोडगे | ११३ |
| १५. | 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातील महात्मा जोतीराव फुले यांचे विचार | श्रीमाला कालिदास गुडदे | ११८ |
| १६. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक विचार | डॉ. बी. एस. क्षीरसागर | १२२ |
| १७. | भारतीय स्त्रीजीवनात क्रांती घडवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | श्रीम. पूनम प्रकाशराव माने | १२८ |
| १८. | महात्मा फुले यांच्या शेतकरी प्रश्नाविषयीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. डॉ. मालती अशोक सानप | १३५ |
| १९. | महात्मा फुले व सत्यशोधक समाज | डॉ. श्रेया संजीव दाणी | १४२ |
| २०. | "महात्मा ज्योतीराव फुले यांचे अस्पृश्यउद्धारक कार्य : एक अभ्यास" | डॉ. एन. जी. भद्रे | १४८ |
| २१. | आदर्श दांपत्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले | वर्षा वसंतराव लगडे (माळी) | १५४ |
| २२. | महात्मा ज्योतिबा फुले स्त्री चळवळीचे प्रणेते | प्रा. डॉ. ए. व्ही. शिंदे | १६४ |
| २३. | महात्मा फुले : जीवन व कार्य | प्रा. मच्छिंद्र नाथा बेलोटे | १६८ |
| २४. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार | डॉ. नवीन केशवराव सोळंके | १७४ |
| २५. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे शेतकरी विषयक चिंतन | प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | १७९ |
| २६. | महात्मा ज्योतीबा फुले व सावित्री फुले यांचे स्त्री शिक्षण, सामाजिक कार्यात जडण–घडणीतील योगदान | विद्या दगडू वाघमारे | १८४ |
| २७. | ''महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य'' | श्री. सुरेश नामदेव दांडगे | १९२ |
| २८. | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य | डॉ. घन आनंद | २०३ |





| | | | |
|---|---|---|---|
| | | लक्ष्मीकांत | |
| २९. | स्त्री शिक्षणाचे अग्रदूत | डॉ. बोचरे जे. एम. | २०९ |
| ३०. | सत्यशोधक समाज आणि आमदार रायभान जाधव यांची कामगिरी | डॉ. रमेश धनराज जाधव | २१३ |
| ३१. | महात्मा फुलेंच्या शिक्षणविषयक विचाराची ऐतिहासिक चिकित्सा | डॉ. गणेश गोविंदराव माने | २२० |
| ३२. | महात्मा फुले व सत्यशोधक समाज | डॉ. अपर्णा पांडुरंग चाटे (तांदळे) | २२६ |
| ३३. | महात्मा ज्योतिराव फुले आणि सत्यशोधक समाज | डॉ. संतोष पाटील | २३२ |
| ३४. | आधुनिक भारताचे शिल्पकार महात्मा फुले | प्रा. डॉ. प्रिया नरेंद्र कुरकुरे | २३८ |
| ३५. | महात्मा फुले यांचे कृषी विषयक विचार | प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते | २४[illegible] |
| ३६. | महात्मा फुले यांचे तत्कालिन शेती समस्या विषयक विश्लेषण व उपाय योजना | डॉ. भामे गणेश पंढरीनाथ | २५२ |
| ३७. | महात्मा फुले यांचे धर्मविषयक चिंतन | सीमा सूर्यभान जाधव | २५९ |
| ३८. | महिला सबलीकरणातील सावित्रीबाई फुले यांचे योगदान | प्रा. राजश्री गुणाजीराव भोपाळे | २६५ |
| ३९. | महात्मा फुले, गोपाळबाबा वलंगकर आणि अस्पृश्यांमधील प्रबोधन | डॉ. सुनिता शांताराम सावरकर | २७२ |
| ४०. | महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. वसंत नानाराव पतंगे | २७९ |
| ४१. | महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. डॉ. सुरेश कातळे | २८७ |




T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS)
SHIVAJI COLLEGE HINGOLI
Scanned with OKEN Scanner

236

यांच्या यांचा विनियोग मनुष्य जातीच्या कल्याणासाठी करावा असे तत्त्वज्ञान त्यांनी लोकांना सांगितले.

निष्कर्ष

1. महात्मा फुले यांचे तत्वज्ञान हे लोकाभिमुख होते.
2. महात्मा फुले यांचे तत्वज्ञान हे लोक कल्याणकारी होते.
3. त्यांचा लढा हा मानवा मानवा सोबतचा नसून मानवता वादासाठी होता.
4. सर्वसामान्यांना चा उद्धार करणे हीच त्यांची जीवननिष्ठा होती.
5. स्त्रियांना मानव म्हणून या जगात जगता आले पाहिजे हा त्यांचा ध्यास होता.

संदर्भसूची


1. धनंजय कीर, महात्मा ज्योतिवा फुले, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.
2. पुरुषोत्तम खेडेकर, भटोबाचा वर्दनकाळ ज्योतिवा, जिजाऊ प्रकाशन, पुणे.
3. जी एल भिडे, एन डी पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


T.C

Lecturer
Shivaji College,Hingoli
& Dist.Hingoli (MS.)



# महात्मा ज्योतीराव फुले यांचे शेतकरी विषयक चिंतन


प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र

तत्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली


गोषवारा :-

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संबंधी विचार करत असताना असे लक्षात आले की महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासंबंधी, त्यांच्या कार्य संबंधीचे संशोधन हे उदंड स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करणारे आहे. करण ज्योतिराव फुले हे महामानव होते. त्यांच्याविषयी विचार करणे किंवा त्यांचा कोणताही एक दृष्टिकोन मांडणे म्हणजे एकांगी स्वरूपाचे होते. कारण ते व्यक्तिमत्त्व बहुआयामी अनेक कांगोरे असलेलं अशा प्रकारचंआहे. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय कार्याचा आढावा घ्यायचा म्हणजे, त्यांचे कार्य सविस्तरपणे मांडले तर त्यांना न्याय मिळेल. त्यांच्या कार्याच्या परिसीमा अपरिमित आहेत. असीम आहेत. म्हणून स्त्री-उद्धारक, शिक्षण प्रणेते, शेतकऱ्यांचे कैवारी, विधवा महिलांचे तारणहार, समतावादी तत्त्वचिंतक एक ना अनेक भूमिका त्यांनी त्याकाळात बजावल्या आहेत. वैदिकांच्या जाचातून बहुजनांना सोडविण्यासाठी त्यांनी शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, समतावादी तत्त्वज्ञानाची मांडणी या पद्धतीने आपले कार्य बजावण्याचा प्रयत्न केला. त्यांचा परिवर्तनवादी विचार लोकांपर्यंत पोहोचविणे हा प्रस्तुत शोध निबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

संज्ञा:-

शोध कार्यासाठी निवडलेल्या विषय घटकांमधील ज्या अनाकलनीय संज्ञा असतात त्यांचा अर्थ पाहिल्याशिवाय पुढील कार्याला सुरुवात करता येत नाही. महात्मा फुले यांनी भारतातील अप्रगत, मागास शेतकऱ्यांसाठी जो लढा दिला त्या संबंधीचे विवेचन प्रस्तुत शोध प्रबंध निबंधात करण्यात येणार आहे. अनाकलनीय घटकांचाअर्थम्हणजे त्यासंबंधीची व्याख्या होय. त्या व्याख्येच्या आधारे अशा प्रकारचा एखादा विषय साध्या सोप्या शब्दात स्पष्ट करणे म्हणजे व्याख्या होय.

प्रस्तावना:-

समाजामध्ये असलेले अज्ञान, अंधश्रद्धा,देवभोळेपणा, प्रश्न विचारण्याची ताकीद, सामाजिक भेदभाव, उच्चनीचता, स्पृश्यास्पृश्यता, नवस-सायास यामुळे समाज पिंजून निघाला होता. त्यांनी तळागाळातील लोकांना सुसंस्कृत बनविणे हे काम हाती घेतलेले होते. स्त्री उद्धार, दलितोधार, रंजल्या गांजलेल्यांना न्याय हक्क मिळवून देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. वर्णव्यवस्थेचा विरुद्ध लढले. भट ब्राह्मणशाही नष्ट करण्यासाठी त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवले. शेतकऱ्यांना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी पूर्ण आयुष्यभर कार्य केले. महात्मा ज्योतिराव फुले यांनीअज्ञानानेगुरफटलेल्या सर्वसामान्य माणसांना त्यांचा अधिकार प्राप्त करून देण्याचे कार्य केले. शेतकरी कुटुंबात जन्मलेले असल्यामुळे अगदी लहानपणापासून त्यांनी शेतकरी कुटुंबाचे होणारे हाल पाहिले. भट ब्राह्मणांच्या आहारी जाऊन शेतकरी लोक स्वतःची संपत्ती कशा पद्धतीने भटांच्या झोळीत टाकून स्वतः मात्र कंगाल होतात. स्वतः कर्ज काढून का होत नाही पण मटा - ब्राह्मणांची तुंबडी भरतात. स्वतः शेतात राबून राब राब राबतात आणि ब्राह्मण लोकांची सेवाचाकरी करतात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत कुणावर तरी मंगळाची वक्रदृष्टी आहे, तर कोणाची शांती करावी लागेल, तर कोणीतरी आई किंवा वडिलांच्या मुळावर आहे या सबबीखाली ब्राह्मण गरीब शेतकऱ्यांना सतत लुबाडत राहत. असत लहानपणापासूनच चिकित्सक वृत्ती असल्यामुळे ज्योतीला या सर्व गोष्टी आवडत नसत. चिकित्सकपणे कोणत्याही गोष्टीचा अर्थ विचारणे, असे केले तर काय होतं? तसे केले तर काय होते? एक ना अनेक लहानपणापासूनच ज्योती विचारपूस करत असे. पण त्यामुळे तो ब्राह्मणांना मुळीच आवडत नसे. महात्मा फुले हे ब्राह्मणांच्या संदर्भात म्हणतात "ब्राह्मण,भट,जोशी, उपाध्याय इत्यादी लोकांच्या दस्यत्वापासून शूद्रलोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आजहजारो वर्ष ते शूद्रलोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आलेआहेत. यास्तव समुपदेशन व विद्ये द्वारेत्यासत्यांचे वास्तविक अधिकार समजावून देण्याकरिता म्हणजेच धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यास मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शूद्र मंडळींनी हा समाज तारीख २४ माहे सप्टेंबर सन १८७३ इसवी रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयावर

T.C.

Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



बोलणे अजिबात वर्ज्य केले आहे." महात्मा फुले यांना लहानपणापासूनच ब्राह्मणशाही किंवा भट शाही आवडत नसे. त्यांच्या घरी देवपूजा करण्यासाठी येणाऱ्या भटाला ते हजारो प्रश्न विचारून भंडावून सोडत असत.ब्राह्मणांचा इतर बहुजन समाजाशी वर्तन करण्याचा जो नीच प्रकार आहे तो त्यांना आवडत नसे. त्यामुळे ते चिडलेले असत. त्यांच्या लहान वयात त्या बालबुद्धीला हे पटत नसे. व त्यांचे मन त्या वैदिक पंडितांच्या विरुद्ध बंड करून उठत असे. त्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनात अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. लग्नानंतर काही दिवसातच त्यांच्या वडिलांचे राहते घर सोडून त्यांनाजावे लागले.

उद्देश :-

१) महात्मा ज्योतिराव फुले यांचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचविणे.
२) शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्था बदलण्यासाठी प्रयत्न करणे.
३) शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे.
४) महात्मा फुले यांच्या शिकवणीचे महत्त्व सर्व लोकांना पटवून देणे.

विषय विश्लेषण:-

महात्मा ज्योतिराव फुले हे आयुष्यभरपीडित, वंचित वर्गासाठी लढत राहिले. त्यामध्ये मुख्यत्वे करूनस्त्री, शूद्रादीअतिशूद्र, शेतकरी, कामगार यांचा समावेश होता. प्रस्तुत शोधनिबंधात आपल्याला शेतकऱ्यांच्या दुरावस्थेविषयी महात्मा फुले यांचे विचारांची चिकित्साकरावयाचीआहे. आजच्या शेतकऱ्या प्रमाणे त्याकाळचा शेतकरीही नागवला जात होता. त्याचे कारण महात्मा फुले यांनी सांगितले आहे. ते म्हणजे अज्ञान होय. यासंदर्भात ते म्हणतात

"विद्येविना मती गेली मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले."

महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांमध्ये असलेल्या अज्ञानाचाही समाचार घेतला आहे. ते अगदी पोटतिडकीने सर्वसामान्य, पीडित, शूद्रादी अतिशूद्र यांना उद्देशून बोलत, लिहीत असत. त्यांच्या मते भारतीय समाज हा मागास आहे. कारण त्यांच्या ठिकाणी असलेला शिक्षणाचा अभाव हे होय. त्यापैकीच आणखी एक कारण म्हणजे शासनाकडून होत असलेली पिळवणूक हेही होय. पण या सर्वांचे मूळ म्हणजे येथील अज्ञानी जनता होय. त्याचबरोबर अस्मानी

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



Scanned with OKEN Scanner

संकट हे देखील एक कारण होते. करण भारतीय शेतकरी हा निसर्गावर अवलंबून शेती करणारा होता. त्याची वडिलोपार्जित असलेली थोडीफार जमीन व आसपसच्या जंगलामधून फळे,फुले, पाने जमा करून त्याची विक्री करणे. यावर त्याचा उदरनिर्वाह होत असे. नंतरच्या काळात मात्र होत असलेली भरमसाठ जंगलतोड. शासनाचे जमीन अधिग्रहण यामुळे. पूर्वी जंगले सार्वजनिक होती. ती आता सरकारच्या मालकीचे होऊ लागले. हातावर पोट असलेलेशेतात राबणारे शेतकरी गेले. त्यांच्याकडे जोडधंद्यातून येत असलेला पैसा सुद्धा लुबाडला गेला. आणि त्यांची उपासमार होत होती. यासंदर्भात डॉ.ढाले म्हणतात,"शिक्षणाअभावी शेतकऱ्याची व शूद्रादी अतिशूद्र ची सारासार विवेक शक्ती भ्रष्ट झाली आहे. त्यामुळे दारिद्र्य प्राप्त झाले पूर्वी ज्या शेतकऱ्याकडे थोडीफार वडिलोपार्जित जमीन होती त्या जमिनीमध्ये तो कष्ट करीत असे आणि आपला उदरनिर्वाह चालवित असे परंतु सामाजिक मालकीची असणारी जंगले सरकारी झाल्यामुळे गरीब शेतकऱ्याच्या उदरनिर्वाहाचा आधार नष्ट झाला त्यामुळे शेतकऱ्याची अवस्था दयनीय बनली." अशा रीतीने तो अधिकच कंगाल झाला त्याच्या या स्थितीला स्वतःतोच काही प्रमाणात जबाबदार असल्याचे आपल्या लक्षात येते. याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या ठिकाणी असलेले अज्ञान,अव्यवहारीकता हेही आहे. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या शेतकरी सहजासहजी भटांच्या ही तावडीत सापडला. त्याचे दुःखाचे, आनंदाचे, अपयशाचे क्षण भटांनी हेरले. आणि त्या अज्ञानी जणांना अधिकच कंगाल करण्यास भटाने सुरुवात केली. महात्मा फुले म्हणतातकुणबी हे गरीब होते त्यांना धड खायला अन्न नव्हते, अंगात घालायला कपडे नव्हते. तरीही धार्मिक कार्यासाठी हे कुणबी लोक कर्ज काढीत असत. तीर्थयात्रेसाठी सुद्धा कर्ज काढत असत भट पुरोहित यांना वेगवेगळ्या कारणाने सतत पिळवणूक करीत असत. एखाद्याला देव लागला, भूत लागले, काहीतरी अपशकून झाला, घरात आनंद, शांती नाही, बरकत नाही, मुला मुलीचे लग्न जमत नाही, किंवा लग्न होणार आहे अशा अनेक कारणांनी भट लोक सर्व सामान्य लोकांची पिळवणूक करत असत. अंधश्रद्धेपोटी सामान्य माणूस या ओझ्याखाली दावला जात असे. या सर्वांपासून बहुजन वर्गाची सुटका होणार होती. ती म्हणजे शिक्षणामुळे. असे महात्मा फुले यांना वाटत असे वेगवेगळ्या अंधश्रद्धा मध्ये खितपत पडलेल्या बहुजन समाजाचाग्रह झाला होता की ब्राह्मण लोक सांगतील तेच



तेच खरे. ते म्हणतील तीच पूर्व दिशा. यासंदर्भात विचार व्यक्त करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात "ब्राह्मणांच्या भुवयानां होकायंत्र समजू नका." पण बहुजन समाजावर वैदिक विचारांचा एवढा पगडा होता की इतर कोणी त्यांना काही समजून सांगू शकत नसे. एकेठिकाणी महात्मा फुले म्हणतात,"दिवसभर उन्हातान्हात घाम गाळणारा जगाचा पोशिंदा शेतकरी दुखी आणि सरकारचे कामचुकार व भ्रष्ट नोकरशहा सुखी आहेत अवयव आणि बुद्धी दोघांनाही. सारखीच असताना समाजात विषमता आहे ही विषमता नष्ट करून समताधिष्ठित समाज रचना निर्माण करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची ही दैना संपवण्याची असेल तर त्यासाठी बळीचे राज्य स्थापन केले पाहिजे." अतिशय तळमळीने फुले यांनी शेतकऱ्या विषयी आपले मत मांडले आहे. तेवढ्याच तळमळीने त्यांनी लोकजागृतीचे कार्य केले आहे. त्याची सुरुवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली. परखड पुरोगामी विचारांमुळे महात्मा फुले आणि त्यांच्या वडिलांचे सुरुवातीला खूप भांडण होत असे. त्यांचे विचार पटत नसत. म्हणूनवडिलांनी त्यांना सुरुवातीलाच आपल्या राहत्या घरातून बाहेर काढले. पण कालांतराने त्यांनाही महात्मा फुले यांचे विचार पटत होते. शेवटी त्यांनी आपल्या वडिलांना सुद्धा अंधकारातून बाहेर काढले. सामाजिक अनिष्ट रूढी परंपरा आणि विशेष म्हणजे ब्राह्मणांचे कर्मकांड या विरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला.

निष्कर्ष:-

1. शेतकऱ्याला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी आपले जीवन वेचले.
2. जातीव्यवस्था, अनिष्ट रूढी, परंपरा यांच्या विरुद्ध लढा दिला.
3. शेतकऱ्यांची जी स्थिती आहे ती त्यांच्या अज्ञानामुळे आहे हे सिद्ध झाले.

संदर्भसूची:-

1. सत्यशोधक चळवळ : वाटचाल आणि चिकित्सा, डॉ. संभाजी खराट, प्रतिमा प्रकाशन पुणे.
2. शेतकऱ्याचा आसूड, डॉ. मोकाटे वसुदेव, (संपा) स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
3. महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार विश्व, डॉ. क्षीरसागर वी. एम. (संपा), न्यू मॅनपब्लिकेशन, परभणी.
4. महात्मा फुले यांचा धर्म, डॉ. आ. ह. साळुंखे लोकवांगमय प्रकाशन, मुंबई.

T. C.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



Scanned with OKEN Scanner